

शब्दांचा अवकाश

जयंत नारळीकर
jayant@iucaa.ernet.in

# काही पौराणिक किस्से... असेही!

**आपलं पौराणिक वाङ्मय विविधतेनं भरलेलं आहे. एकीकडं त्यात तत्त्वज्ञानाच्या अनेक प्रकारांचं सखोल विवेचन आढळेल; तर दुसऱ्या टोकाला नातवांना खिळवून ठेवणारे आजीबाईंचे किस्सेही सापडतील. अशा गोष्टींत मानवाचंच नव्हे; तर देव-दानव-यक्ष-गंधर्व आदींचं विविधरंगी स्वभाववैचित्र्य दिसतं. त्यावरून वाटतं, की या कथांचे रचनाकार मानवी स्वभावांच्या छटांशी परिचित असावेत. या वेळच्या सदरात अशाच काही फारशा प्रसिद्ध नसलेल्या पौराणिक कथांची ही झलक...**

******

## कुत्र्याची तक्रार

रामराज्यात रामानं आवाहन केलं होतं : 'रयतेतल्या ज्यांची कुणाची काही तक्रार असेल, आपल्यावर काही अन्याय झाला आहे, असं ज्यांना वाटत असेल, त्यांनी राजदरबारात येऊन आपल्या तक्रारी मांडाव्यात...'

या आवाहनाला प्रतिसाद देत एक अक्राळविक्राळ कुत्रा रामापुढं दाखल झाला. रामानं येण्याचं कारण विचारलं.

कुत्रा म्हणाला : "माझी तक्रार एका संन्यासीमहाशयांविरुद्ध आहे. ते बाहेर थांबलेत."

रामानं संन्याशीमहाशयांना दरबारात बोलावलं आणि त्यांच्यादेखत कुत्र्याला त्याची तक्रार मांडायला सांगितलं.

कुत्रा म्हणाला : "हे महाशय भिक्षा मागत दारोदार फिरत होते, तेव्हा मीही खाद्यान्नाच्या अपेक्षेनं त्यांच्या पाठोपाठ गेलो. सकाळभर फिरून आम्हाला काही मिळलं नाही. शेवटी अपयशाचं खापर माझ्या डोक्यावर फोडत त्यांनी मला लाथ मारली."

रामानं या तक्रारीचा खरे-खोटेपणा ठरवायला



संन्यासीमहाशयांना त्यांची प्रतिक्रिया विचारली.

"हे सर्व खरे आहे महाराज।" संन्यासीमहाशय उत्तरले.

ते पुढं म्हणाले : "त्या दिवशी मी एखाद्या घरी 'भवति भिक्षांदेही' म्हटलं, की गृहिणी दार उघडून भिक्षा द्यायला येई; पण या भयानक कुत्र्याला घाबरून भिक्षा न देता ती दार बंद करी. सकाळभर हा प्रकार सुरू होता. याच्यामुळं आपल्याला भुकेलं राहावं लागतंय म्हणून रागावून मी याला लाथ मारली. अर्थात, हा कुत्रा भयानक दिसतो, हा त्याचा दोष नव्हे, म्हणून मीही खरंतर संयम बाळगायला हवा होता. ते मला जमलं नाही, ही माझी चूक मी कबूल करतो. आपण द्याल ती शिक्षा स्वीकारायला मी तयार आहे."

रामानं स्मित करत कुत्र्याला विचारलं : "कुत्रोपंत, सांगा, काय शिक्षा द्यावी?"

कुत्रा उत्तरला : "महाराज ! आपण एक नवं विद्यापीठ स्थापन करा आणि या महाशयांना त्या विद्यापीठाचे कुलगुरू करा."

राम चकित झाला. त्यानं विचारलं : "ही तर मानाची जागा आहे...संन्यासीमहाशयांना शिक्षा करायची आहे, हे तुम्ही विसरलात का?"

"नाही महाराज !" कुत्रा म्हणाला : "विद्यापीठाच्या कुलगुरूला इतक्या काळज्या घेरून असतात, की ते पद म्हणजे त्यांना ती एकप्रकारची शिक्षाच असते."

कलियुगातल्या भारतीय कुलगुरूंनाही असाच अनुभव येतो का?

******

## लक्ष्मी-विष्णू यांचं 'भागवता'ख्यान

लक्ष्मी आणि विष्णू आलटून-पालटून 'भागवत' या ग्रंथाचं पारायण करतात; पण लक्ष्मीला पारायण करायला विष्णूच्या चौपट वेळ लागतो. ते का? उत्तर 'भागवता'तच दिलेलं आहे : "अधिकारे स्थितो विष्णुः लक्ष्मी निश्चिंतमानसा."

विष्णू हा विश्वाचा रक्षक असल्यानं अधिकाराच्या पदावर आहे. त्या कामाच्या व्यापामुळं त्याला 'भागवत' वाचायला वेळ नसतो. त्यामुळं तो 'भागवता'चं वाचन झटपट उरकतो ! उलट, लक्ष्मीला काही जबाबदारीचं काम नसल्यानं ती निश्चिंत मनानं, आराम से 'भागवता'ख्यान लावते.

आजकालच्या भारतीय गृहिणी याला अपवाद आहेत !

******



## भक्तश्रेष्ठ कोण?

एकदा नारदमुनी विष्णूकडं गेले एक प्रश्न घेऊन। "देवाधिदेवा ! सांगा पाहू तुमचा सर्वोत्तम भक्त कोण?"

विष्णू हसले. नारदांना कुठलं उत्तर हवं होतं, हे त्यांनी ओळखलं; पण त्यांनी खरं तेच सांगितलं. त्यांचा सर्वोत्तम भक्त अमुक अमुक गावी राहणारा तमुक तमुक शेतकरी होता. उत्तर ऐकून नारदांचा चेहरा पडला. विष्णू म्हणाले : "नारदा, तू त्या शेतकऱ्याला भेटून ये; म्हणजे तुला माझं उत्तर समजेल." नारद तिकडे जायला तयार झाले, तेव्हा विष्णू म्हणाले : "तू निघालाच आहेस तर माझं एक काम कर. हा तेल भरलेला घडा त्या शेतकऱ्याकडं पोचवून ये. मात्र, यातला एक थेंबही जमिनीवर पडता कामा नये."

नारद घडा डोक्यावर ठेवून निघाले. मात्र, तेलानं काठोकाठ भरलेला तो घडा घेऊन त्यांना अत्यंत काळजीपूर्वक चालावं लागलं.

शेतकऱ्याच्या घरी पोचल्यावर घडा त्याच्या स्वाधीन केल्यावर नारदांना समाधान वाटलं. गप्पा मारताना त्यांनी शेतकऱ्याला विचारलं :

"तू विष्णुभक्त आहेस...सांग, तू ही भक्ती कशी करतोस?"

शेतकरी म्हणाला : "मी न चुकता सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्यापूर्वी विष्णूंचं नामस्मरण करतो."

'दोनच वेळा... ?' नारद मनाशी म्हणाले : 'मी दिवसभर 'नारायण...नारायण' हा जप करतो. त्याला भगवंतांनी काहीच महत्त्व देऊ नये?'

परतल्यावर नारदांनी विष्णूंना हा प्रश्न विचारला. विष्णूंनी प्रतिप्रश्न केला. "नारदा ! सांग पाहू, तो घडा घेऊन जाताना तू किती वेळा माझं नामस्मरण केलंस?"

नारद उत्तरले : "भगवंता, तुमच्याच आज्ञेनं घडा घेऊन जाताना माझं सगळं लक्ष तेल सांडू नये इकडं होतं. त्या वेळी नामस्मरण राहून गेलं." तेव्हा विष्णू म्हणाले : "बा, नारदा ! घडाभर तेल नेताना तू मला विसरलास आणि तिकडं जीवनाचा गाडा कष्टानं हाकत असतानादेखील तो शेतकरी न विसरता माझं नामस्मरण करतो."

कधी नव्हे ते नारद निरुत्तर झाले !

******

## संजय उवाच

महाभारत युद्ध सुरू असताना त्याचं 'आँखो देखा' वृत्त कळावं, अशी इच्छा धृतराष्ट्रानं व्यक्त केली, तेव्हा दिव्य दृष्टी देऊन कृष्णानं संजयाला ती जबाबदारी दिली. यामध्ये खरी गोम काय होती, हे लोकांना फारसं माहीत नाही !

ती अशी : युद्धाच्या आधी धृतराष्ट्रानं पांडवांकडं संजयाला पाठवून त्याच्या तोंडून आपली भावना वदवली..."खरोखर युद्धाची गरज नाही. युद्ध झालं तर उभयपक्षी प्रचंड नरसंहार होणार. सग्या-सोयऱ्यांना मारून शेवटी जेत्याला काय मिळेल? आणि मिळालेलं राज्य अशा दुःखद पार्श्वभूमीवर भोगायला कुणाला आवडेल?" हा युक्तिवाद करून विशेषतः अर्जुनाचं मन वळवण्याचं काम संजयानं केलं.

सर्वज्ञ कृष्णाला हे कळलं आणि धृतराष्ट्र व संजय या दोघांना धडा शिकवण्यासाठी कृष्णानं वरील योजना केली. युद्धारंभी अर्जुन हा संजयाच्या युक्तिवादानं ढेपाळला होता. त्याला संजयाच्या 'ब्रेन वॉशिंग'मधून बाहेर काढून ताळ्यावर आणण्याचं काम गीता सांगून कृष्णानं केलं; पण आपला 'कट' कसा विफल झाला, ते धृतराष्ट्र आणि संजय यांना कळलं. एवढंच नव्हे तर, आपण केलेल्या युक्तिवादाचं कृष्णानं दिलेलं समर्पक उत्तर संजयाच्या तोंडून धृतराष्ट्राला ऐकावं लागलं.

******

## शल्याला फितवणं...

मद्रराज शल्य हा माद्रीचे भाऊ व पांडवांचा मामा. युद्धाची तयारी सुरू झाली आणि कौरव-पांडव या दोन प्रतिस्पर्ध्यांनी इतर राजांशी हातमिळवणी सुरू केली. पांडवांच्या आवाहनाला साद देत मद्र देशातून शल्य हस्तिनापुराकडं निघाला; पण 'अब दिल्ली दूर नहीं' अशा स्थितीत तो आला असताना त्याला वाटेत अनपेक्षितपणे विश्रांतिस्थान लाभलं. तिथं त्याची सर्व तऱ्हेनं उत्तम सरबराई केली गेली. त्याला आधी वाटलं, की ही सोय युधिष्ठिरानं केली असावी; पण शल्याला तिथं आरामात डांबून ठेवायची कल्पना होती दुर्योधनाची. अखेर या सरबराईचं काय प्रतिफळ हवं, असं शल्यानं विचारता दुर्योधनानं विनंती केली : "महाराज, युद्धात तुम्ही आमच्या बाजूनं या..." शब्द दिल्यामुळं शल्याचा इलाज नव्हता; पण पांडव खट्टू झाले. तरी 'धर्म'राज युधिष्ठिरानं, 'युद्धात ऐनवेळी कर्णाचं सारथ्य स्वीकारून त्याचा तेजोभंग करावा,' अशी सूचना शल्याला केली व शल्यानं ती अमलात आणली.

******

अलीकडच्या आयाराम/ गयारामच्या जमान्यात एका पक्षाच्या फुटीर आमदारांना दुसरा पक्ष पंचतारांकित हॉटेलात बंदिस्त करून ठेवतो. शल्याच्या बाबतीत हेच घडलं! आणि फुटीर आमदार केव्हा दगा देतील, त्याचंही उदाहरण शल्याकडून मिळतं.

शेवटी, व्यासांनी महाभारतातून मनुष्यस्वभावचं जे वैविध्यपूर्ण दर्शन घडवलं आहे, त्याचं प्रतिबिंब आजही दिसतं !